महाराष्ट्र विधानपरिषद
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५
(सकाळी १०.३० ते ११.४५ वाजता)

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (शेवटचा दिवस)

(दुपारी १२.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —

कृषी मंत्री : "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —

(बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) -- [अनुक्रमांक (१)] --

(१) **ॲड.निरंजन डावखरे,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रसाद लाड, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यांतील घर खरेदीदारांना विकासकांकडून नुकसान भरपाईपोटी येणे असलेली २०० कोटींहून अधिक रक्कम वसूलीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून हलगर्जी सुरू असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यामुळे महारेराचे अध्यक्ष यांनी दिलेले आदेश कागदावर राहिले असणे, मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विकासकांची खाती गोठवण्याची कारवाई करण्याच्या दृष्टीने हालचाल करताच विकासकांनी महारेराच्या आदेशानुसार भरपाई दिलेले असणे, ठाणे शहरात केवळ पाच विकासकांकडे १०७ कोटी रुपये अडकले असणे, ही रक्कम वसूल

अस्वाक्षरित प्रत

करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले तर ७५ टक्के रक्कम वसूल होण्याची शक्यता असणे, ठाणे जिल्ह्यात ९८ प्रकल्पांत २२२ घर -खरेदीदार तक्रारदारांचे १५५ कोटी ३२ लाख रुपये वसूल व्हायचे होते, यापैकी आतापर्यंत १५ प्रकल्पांत २७ घर खरेदीदारांचे केवळ ११ कोटी ६५ लाख रुपये वसूल झाले असणे, पालघर जिल्ह्यात ३३ प्रकल्पांकडे ७९ जणांचे २८ कोटी १९ लक्ष रुपये वसूली बाकी असणे, रायगड जिल्ह्यात ३३ प्रकल्पांतील ६५ खरेदीदारांचे ३० कोटी ९२ लक्ष रुपये प्रलंबित असणे, शासनाने उक्त प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ वसुलीबाबत कारवाई करण्याचे आदेश देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. विक्रम काळे**, डॉ. मनिषा कायंदे, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विशेषत: मुंबई, नवी मुंबई, कल्याण, मीरा-भाईंदर, कांदिवली, तुर्भे या व अन्य भागात "टोरेस" या विदेशी कंपनीकडून गुंतवणुदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत माहे जानेवारी, २०२५ मध्ये उघडकीस येणे, यामध्ये राज्यातील सव्वा लाखापेक्षा जास्त गुंतवणूकदारांची झालेली फसवणूक, याप्रकरणी हजारो गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारी, त्याअनुषंगाने पोलिसांनी कोट्यवधी रुपयांची रोकड व दागिने व अन्य मुद्देमाल जप्त करणे, अधिक परतावा मिळत असल्याने अनेकांनी लालसेपोटी केलेली गुंतवणूक व त्यामध्ये गुंतवणूकदारांची झालेली कोट्यवधी रुपयांची फसवणूक, याप्रकरणी पोलिसांनी टोरेस ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटिनम हर्न कंपनीसह त्यांचे संचालकांवर गुन्हे दाखल करुनही अद्याप गुंतवणूकदारांनी गुंतलेली रक्कम त्यांना परत न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेले भितीचे व घबराटीचे वातावरण, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन सर्वसामान्य गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम परत मिळवून देण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कारवाई तसेच कंपनीच्या संचालकांवर करावयाची कायदेशीर कारवाई व शासनाची भुमिका." "

(३) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, **वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गत वर्षात ठाणे शहरात रस्ते अपघातात २३० नागरीकांचे प्राण गेले असणे, अनेक वृध्दांचा यात समावेश असणे, घोडबंदर परिसरात ठाणे महापालिका व नगररचना विभागाने हजारो महाकाय संकुल बांधकामांना परवानगी देत असताना वाहतुकीसाठी रस्त्यांच्या व्यवस्थेकडे साफ दुर्लक्ष केले असणे, परिणामी ठाण्याच्या प्रत्येक मुख्य रस्त्यावर सातत्याने वाहतुक कोंडी

अग्रिम प्रत

होऊन पंधरा ते वीस मिनिटांच्या प्रवासाला तास-दीड तासाचा कालावधी लागत असणे, परिणामी मनुष्यतासांची हानी, नागरीकांना होणारा मनस्ताप, इंधन हानी, वायू प्रदूषण, रस्ते अपघात या गोष्टींना सामोरे जावे लागत असणे, ठाण्यातील मुख्य रस्ते मृत्यूचे सापळे झाले असून प्रशासनाकडून या समस्या सोडवणूकीसाठी प्रयत्न होताना दिसत नसणे, वागळे इस्टेट, वर्तक नगर, नौपाडा, पाचपाखाडी,ओवळा, आनंदनगर, डी मार्ट चौक, कासारवडवली या भागात बॉटलनेक तयार झाले असणे, रहदारी सुव्यवस्थित ठेवण्याऐवजी वाहने पूल करुन अधिकृत, अनधिकृत दंड वसूल करण्याकडे वाहतूक पोलिसांचा ओढा असणे, कोलमडलेल्या वाहतूक समस्येमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, उक्त निर्णय भूमीधारकांच्या आणि संबंधित संस्थांच्या अधिकारांवर गंभीर परिणाम करणारा असणे, सदरहू जमिनींवर मोठ्या प्रमाणात लोकांच्या भावना आणि धर्मिक श्रद्धा जोडलेल्या असून जमिनींची वर्गवारी बदलणे म्हणजे संबंधित संस्थांचे अस्तित्व धोक्यात येणे, मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात असलेल्या इनाम व देवस्थानच्या अनेक जमिनी काही खाजगी व्यक्तींनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्वतःच्या ताब्यात घेतलेल्या अथवा अतिक्रमण करणे, सदरहू जमिनी अतिक्रमण मुक्त करून पुन्हा देवस्थानच्या ताब्यात द्याव्यात अशा प्रकारचे आदेश माननीय उच्च व सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेले असणे, त्याचे काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे असताना, त्याकडे दुर्लक्ष करुन शासनाने घेतलेला सदरचा निर्णय म्हणजे मा.न्यायालयाचा अवमानच असणे, त्यामुळे वर्ग दोनच्या जमिनींचा वर्ग एक करण्यात येत असताना, यावर पूर्वीच्या कायद्याच्या दृष्टीने आणि न्यायाच्या नियमांच्या आधारावर विचार होणे अत्यंत आवश्यक असणे, तसेच, या निर्णयामुळे अनेक शेतकरी आणि धार्मिक संस्था प्रभावित होण्याची शक्यता असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करून सदरहू निर्णयामुळे प्रभावित होणाऱ्या लोकांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने वर्ग दोनच्या जमिनींचा वर्ग एक करण्याचा घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(५) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. धीरज लिंगाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात जलसंपदा विभागाने ३० जून पर्यंत सर्व शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला जलमापक यंत्र बसविण्याचा संकल्प केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, याकरिता शासनाने या संदर्भात अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या असणे, याबाबत जलमापक यंत्र बसवण्याची सक्तीही शेतकऱ्यांना करण्यात येणार असल्याने राज्यातील प्रामुख्याने कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असणे, वास्तविक कोल्हापूर, सांगली जिल्ह्याला दरवर्षी महापूराचा धोका असतो त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांचे विद्युत मोटर टिकाव धरत नसणे, काही वेळा पुराच्या पाण्यात मोटर, महावितरणचे खांब, डीपी बॉक्सही वाहून जात असणे त्यामुळे जलमापक यंत्र ही टिकणार नाहीत अशी भावना संतप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली असणे, शेतकऱ्यांवर होणाऱ्या जलमापक यंत्र सक्तीविरोधात इरिगेशन फेडरेशनने जलमापक यंत्र सक्ती रद्द करावी याकरिता आंदोलन करण्याचाही इशारा दिला असणे, तरीही शासन याबाबत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)

- मध्यंतर -

सात : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

आठ : सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)
खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.

१) मुख्यमंत्री

२) उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री)

३) महसूल मंत्री

४) उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्य मंत्री

५) वने मंत्री

६) शालेय शिक्षण मंत्री

७) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

८) पणन, राजशिष्टाचार मंत्री

९) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

१०) कृषी मंत्री

११) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

१२) वस्त्रोद्योग मंत्री

१३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

१४) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

१५) सहकार मंत्री

नऊ : (क) **सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"सरकारच्या फसव्या योजना आणि दिशाहीन धोरणे यामुळे राज्यातील शेतकरी, मजूर, महिला आणि युवक संकटात असणे, ग्रामीण आणि आदिवासी भागांत अद्यापही मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, अनेक ठिकाणी जिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, औषधे आणि उपकरणांचा अभाव असणे, ठाणे आणि पुण्यातील मनोरुग्णालयांतील परिस्थिती अत्यंत दयनीय असणे, सरकारी रुग्णालयांत अस्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची हजारो पदे रिक्त असून पदभरती अभावी रुग्णसेवा प्रभावित होणे, सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविणे कठीण झाले असून खासगी वैद्यकीय शिक्षण अतिशय महाग झालेले असूनही शासनाने सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढविण्याऐवजी नविन खाजगी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास दिलेली परवानगी, शासकीय रुग्णालयांना औषध पुरवठा करण्याचे कंत्राट आपल्या जवळील कंत्राटदारास मिळण्याच्या दृष्टीने हाफकिन

अमुद्रित प्रत

महामंडळासोबत केलेला करार रद्द केलेला असणे, तथापि, सदरहू कंत्राटदाराकडून औषध पुरवठा करण्यास होत असलेला विलंब, त्यामुळे अनेक रुग्ण उपचाराअभावी मृत्युला सामोरे जावे लागणे, सरकारने अनेक कर्जमाफी योजना घोषित केल्या पण सर्वांना प्रत्यक्ष लाभ मिळाला नसणे, विमा कंपन्या शेतकऱ्यांना भरपाई देत नसून शासन देखील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करीत असणे, शेतीसाठी अपुरा वीजपुरवठा आणि सिंचन योजनांमध्ये भ्रष्टाचार झाल्याने शेतीला पाणी मिळत नसणे, शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नसणे, बोगस खते व बियाणे विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात होणारे नुकसान, दलाल शेतकऱ्यांची लूट करीत असणे, कृषी संकटामुळे शेतमजूर आणि शेतकरी दोघेही बेरोजगार झालेले असणे, कृषी विभागात निविष्ठा खरेदी व विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाला असून त्यावर कारवाई करण्यास राज्य शासनाकडून होत असलेली दिरंगाई, विद्यमान व माजी मंत्र्यांच्या अखत्यारित असलेल्या खात्यातील विविध कामे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय, परिणामी यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे समोरे येणे, चुकीचे निर्णय व नविन धोरणे यामुळे राज्यावर कर्जाचा वाढलेला बोजा, प्री-पेड मीटर लावण्यास नागरिकांचा विरोध असतानाही महावितरणकडून मीटर लावण्याची होत असलेली सक्ती, नव्या मीटरसाठी अतिरिक्त शुल्क आकारणे, महावितरणच्या ३२९ उपकेंद्रांचे खासगीकरण करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, शासनाच्या महत्त्वाच्या विभागांमध्ये हजारो जागा रिक्त असून, भरती प्रक्रिया लांबणीवर पडल्यामुळे अनेक उमेदवार शासकीय नोकरीपासून वंचित राहणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक परिक्षांचा निकाल न लागणे, शासनाने काही खाजगी संस्थाचा फायदा होण्याच्या दृष्टीने कंत्राटी पध्दतीने कर्मचारी भरण्याचा घेतलेला निर्णय, बेरोजगार तरुणांसाठी ठोस धोरणे नसणे, राज्यातील इतर मागास वर्ग, भटक्या जाती व विमुक्त जाती, अनुसूचित जाती, जमाती व खुल्या प्रवर्गाच्या सारथी, बार्टी, महाज्योती सारख्या योजनांच्या अनुदान वितरणास होत असलेला विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असलेला परिणाम, शक्तीपीठ महामार्गास जनतेचा विरोध असूनही शासनाचा सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी सुरु असलेला प्रयत्न, मुंबई-गोवा महामार्गाचे गत १२-१५ वर्षांपासून महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसल्याने वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली असणे, महामार्गाच्या कामासाठी आवश्यक निधी वेळेवर मंजूर होत नसणे, अनेकवेळा कंत्राटदार बदलण्यात येवूनही दर्जाहीन काम सुरु असणे, पावसाळ्यात महामार्गावर पूरस्थिती निर्माण होत असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून १६ हजार कोटी रुपयांच्या विविध योजना राबविण्यात येणे, उक्त योजनेतून मिळणारी मदत थेट लाभार्थ्यांना मिळत नसून अन्य व्यक्तींना मिळणे, त्यामुळे अनेक कामगार योजनेतून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिले असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून सदरहू

अग्रिम प्रत

योजनेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

(ख) **(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ व बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव**) ---

सर्वश्री प्रविण दरेकर, विक्रम काळे, हेमंत पाटील, सदाशिव खोत, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री परिणय फुके, शिवाजीराव गर्जे, सतिश चव्हाण, प्रसाद लाड, पंकज भुजबळ, श्रीकांत भारतीय, श्रीमती भावना गवळी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, वसंत खंडेलवाल, किशोर दराडे, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमरीशभाई पटेल, राजहंस सिंह, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतक-यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेवून आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, “नमो शेतकरी महासन्मान निधी” योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबवून पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी “मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)” प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, “मागेल त्याला शेततळे” या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड,

असुधारित प्रत

POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतकऱ्यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतकऱ्यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची

आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सुत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतक-यांना लाभ मिळणे, ‘नारीशक्ती दुत ॲप’ हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजु महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्याच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी,

पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —

सर्वश्री सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"इंडियाबुल्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस सिन्नर औद्योगिक क्षेत्रामध्ये केंद्र शासनाच्या सेझ अधिनियम, २००५ अन्वये २६०० एकर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिले असणे, मात्र कंपनीने विहित मर्यादेत या ठिकाणी विकास केला नसणे, १८ वर्षानंतरही या ठिकाणी उद्योग न उभारल्यामुळे ही जमीन परत घेऊन स्थानिक उद्योजकांना फेर वाटप करण्याची गरज असणे, याबाबत मा मंत्री, उद्योग यांच्यासमवेत बैठक झाली असून या बैठकीचे इतिवृत्त सुद्धा तयार करण्यात आलेले नसणे, तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या समवेत सुद्धा मा. प्रतिनिधींनी बैठक घेतली असणे, या मागणीचा मा. सदस्यांकडून गेल्या २ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करुन शासनाकडे पत्रव्यवहार केला असणे, सन २०२३ मध्ये याबाबत विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून चर्चा उपस्थित करूनही कार्यवाही होत नसल्याने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई
दिनांक : ५ मार्च, २०२५

जितेंद्र भोळे
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत